# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

'दिनदर्शिका व दैनंदिनी २०१९' छपाई कामाचे जाहीर दरपत्रक

'दिनदर्शिका २०१९' व 'दैनंदिनी २०१९' छपाई कामाचे जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची सर्व माहिती www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

स्वा/—
कार्यकारी अधिकारी,
(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०, ९७६३४४३८२१)

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## दरपत्रक फॉर्म

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– दिनदर्शिका २०१९ व दैनंदिनी २०१९ छपाई कामाचे जाहीर दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :– श्री.–––––––––––––––––––––––––––––

पूर्ण पत्ता :– –––––––––––––––––––––––––––––

–––––––––––––––––––––––––––––

मोबाईल क्रं.:– –––––––––––––––––––––––––––––

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने दिनदर्शिका २०१९ व दैनंदिनी २०१९ छपाई कामाचे दि.११/१०/२०१८ रोजीचे दै.पंढरी भूषण, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर दरपत्रकाप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ क्र | तपशील | दर रू. (प्रति नग) (सर्व करासहीत व पोहोच खर्चासहीत) |
|---|---|---|
| ०१ | दिनदर्शिका २०१९ (भिंतीवर लावायची) | |
| ०२ | दैनंदिनी २०१९ | |

सदर दराने सदरची छपाई करून तात्काळ पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. तसेच रू.५,०००/– अनामत रकमेचा डी.डी./जमा पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे सदर छपाईचे काम मला मिळणेस विनंती आहे.

दिनांक /१०/२०१८ पुरवठाधारकाची सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. यापूर्वी सदरची छपाई करून पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. छपाई कामासाठी आवश्यक असलेल्या शासकीय परवान्यांच्या प्रती.
५. शॉप ॲक्ट लायसन्स.
६. पॅनकार्ड.
७. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## दिनदर्शिका २०१९ व दैनंदिनी २०१९ छपाई कामाचे जाहीर दरपत्रक.

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि.२०/१०/२०१८ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक दिनदर्शिका २०१९ व दैनंदिनी २०१९ छपाई करणे कामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा.

२. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

३. अनामत रक्कम रू.५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे किंवा डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

४. छपाई कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | दिनदर्शिका २०१९ (भिंतीवर लावायची) :— साईज — ए३, पाने — १२, छपाई — पुढील बाजूस मल्टीकलर व मागील बाजूस सिंगल कलर, पेपर — आर्ट पेपर ९० जि.एस.एम. (ग्लॉस पेपर). | १००० |
| ०२ | दैनंदिनी २०१९ | १००० |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच छपाई करणे आवश्यक आहे.

६. छपाई नमुना नित्योपचार विभाग, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे पाहावयास मिळेल.

७. छपाई चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

८. छपाईमध्ये व त्यासाठी वापरण्यात आलेल्या कागदामध्ये अथवा बांधणीमध्ये दोष आढळून आलेस ठेकेदारास जबाबदार धरणेत येईल. प्रस्तुतकामी दुबारा छपाई करण्याचे झालेस ती ठेकेदारांनी स्व:खर्चाने करून देणेची आहे.

९. छपाईची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकीय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

११. छपाई खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१२. दरपत्रकात नमुद दर सर्व करासहीत नमुद करावा. तसेच सर्व छपाईचा दर नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१३. पुरवठा करण्यात आलेल्या छपाईची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही. सदरची छपाई करून संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे पुरवठा करणे आवश्यक आहे.

१४. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१५. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१६. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१७. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१८. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रके कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२१. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रू.१००/– चे स्टॅम्पपेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (Affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.